**Bachelor of Commerce (B.Com.) Part—II (New) Examination**

**MARATHI**

**Optional Paper—II**

**भाषादर्शन—II**

**(Other Indian Language)**

वेळ — तीन तास] [एकूण गुण — 100

1. 'जनसामान्यांच्या प्रबोधनाचं गतिचक्र' या पाठातून गाडगेबाबांच्या कार्याचा आलेख लेखकाने कसा रेखाटला ते सांगा. 20

**किंवा**

शंकरराव खरात यांच्या 'सांगावा' ह्या कथेतील दलितांच्या वाट्याला येणाऱ्या दु:खाचे चित्रण करा.

2. संत एकनाथांच्या भारूडामधील रूपकात्मकता स्पष्ट करा. 20

**किंवा**

कवी यशवंत ह्यांच्या 'आई' या कवितेचे रसग्रहण करा.

3. **आठपैकी** कोणतेही **चार** प्रश्न सोडवा (शब्दमर्यादा **100** शब्द) :— 20

(i) कॉलेजच्या सहलीकरिता देहू' हे ठिकाण कसे आगळेवेगळे होते ते स्पष्ट करा.

(ii) 'माझे दत्तक वडील' या पाठातून लेखकाने कोणता संदेश दिलेला आहे ?

(iii) ना.सी. फडके यांनी खऱ्या मैत्रीचे मर्म कशा पद्धतीने व्यक्त केले ?

(iv) महाभारतातील विदुराच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू 'माणसांत विरलेला माणूस' या पाठाच्या आधारे उलगडून दाखवा.

(v) 'रामा मैलकुली' या पाठातून लेखकाने ग्रामीण जीवनाचे चित्रण कसे केले ?

(vi) लेखकाला शिकारीचा पश्चात्ताप केव्हा व कां झाला ?

(vii) लेखकाकडे आलेले त्यांचे स्नेही कशामुळे सुखावून जात होते ?

(viii) स्वत:ची स्वायत्तता राखणे भारतीय विद्यापीठांना का शक्य झाले नाही ?

4. आठपैकी कोणतेही **चार** प्रश्न सोडवा (शब्दमर्यादा **100** शब्द) :— 20

(i) 'ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा। काय भुललासी वरलिया रंगा' या अभंगातील भाव स्पष्ट करा.

(ii) 'विद्यार्थ्याप्रत' या कवितेचा आशय थोडक्यात सांगा.

(iii) 'आता आम्ही उठणार, आहोत फिनिक्ससारखे !' असे वैभव सोनारकर का म्हणतात ?

(iv) कवी 'बी' यांच्या 'मासी कन्या' या कवितेतील कारुण्याचे वर्णन करा.

(v) 'आपणच आपले भाग्यविधाते आहोत' असे वसंत बापट का म्हणतात ?



(vi) 'माणसाला माणसाचं जगणं जगता येईल याचा विचार झाला पाहिजे' असे कवी वसंत आबाजी डहाके का म्हणतात ?

(vii) कवी यशवंत मनोहर यांनी 'इथेच' या कवितेत कोणता संदेश दिला आहे ते लिहा.

(viii) कवी ज्ञानेश वाकुडकर यांच्या 'जहर खाऊ नका' या कवितेचा आशय स्पष्ट करा.

5. **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे (प्रत्येकी **5** गुण) :— 20

(अ) बातमी लिहिताना कोणती काळजी घ्यावी ?

(ब) स्मरणिकेचे स्वरूप कसे असते ते थोडक्यात सांगा.

(क) कल्पना विस्तार करा :

'जया अंगी मोठेपण। तया यातना कठीण'

(ड) आठपैकी **पाच** वाक्प्रचार करा :

(i) नाक खुपसणे

(ii) लहान तोंडी मोठा घास घेणे

(iii) आभाळ फाटणे

(iv) डाळ न शिजणे

(v) पायाखालची जमीन हादरणे

(vi) छक्केपंजे सुटणे

(vii) राइचा पर्वत करणे

(viii) पाठीत खंजीर खुपसणे.